उपसंचालक (माहिती), गट-अ (वरिष्ठ) या पदावर तात्पुरती नियमित पदोन्नती देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः मावज-२०२४/प्र.क्र.७६/मावज-२(३४-अ),**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० मे, २०२६

संदर्भ :- शासन आदेश, सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज-२०२४/प्र.क्र.७६/ मावज-२ (३४-अ), दि.२२.०४.२०२५

**शासन आदेश :-**

संदर्भाधीन शासन आदेश, सामान्य प्रशासन विभाग दि.२२.०४.२०२५ अन्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्यरत असलेले श्री.किरण मोघे यांना उपसंचालक(माहिती), गट अ (वरिष्ठ) या पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली होती.

श्री. किरण मोघे यांना देण्यात आलेली तदर्थ पदोन्नती उपसंचालक(माहिती), गट अ (वरिष्ठ) या संवर्गातील नियत वयोमान सेवानिवृत्तीमुळे दि. ३१.१२.२०२५ रोजी रिक्त झालेल्या पदावर नियमित करण्यात येत असून त्यांना खालीलप्रमाणे स्तंभ-६ मध्ये नमूद केल्यानुसार उपसंचालक (माहिती), गट-अ (वरिष्ठ) पदावरील नियमित पदोन्नतीचा दिनांक या आदेशान्वये देण्यात येत आहे.:-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम | प्रवर्ग | विभागाचे नांव | उपसंचालक (माहिती), गट-अ (वरिष्ठ) पदावरील तदर्थ पदोन्नतीचा दिनांक | उपसंचालक (माहिती), गट-अ (वरिष्ठ) पदावरील नियमित पदोन्नतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. किरण मोघे, | खुला | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई. | दि.२२.०४.२०२५ | दि.०१.०१.२०२६ |

२. श्री. किरण मोघे यांनी त्यांच्या वेतननिश्चिती संबंधीचा विकल्प या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा, अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन केली जाईल, याबाबत महासंचालनालयाद्वारे पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

३. श्री.मोघे यांना देण्यात आलेले उपसंचालक (माहिती), गट-अ (वरिष्ठ) पदावरील नियमित पदोन्नतीचे दिनांक हे खालील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांच्या तसेच नमूद अन्य बाबींच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे :-

१) मा. मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दि.०४.०८.२०१७ रोजी पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत दिलेल्या आदेशाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली व प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका (SLP) क्र.२८३०६/२०१७.

२) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन क्र.३३१०/२०२१ व रिट पिटीशन क्र.३३११/२०२१ यामधील आय.ए.क्र.१८५४/२०२१ व २८५५/२०२१ तसेच रिट पिटीशन क्र.३३१२/२०२१.

३) मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधीकरण, मुंबई येथे प्रलंबित मूळ अर्ज क्र.४८८/१७. (श्री. किरण जाधव व इतर)

४) मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधीकरण, मुंबई येथे प्रलंबित मूळ अर्ज क्र.१०६६/१९. (श्री. उल्हास शंकर भोईटे व इतर)

४. सदरचे आदेश सामान्य प्रशासन विभाग का.१२ (सेवा-३) यांच्या ई ऑफिस प्रणालीतील Note # २४, दि.०६.०५.२०२६ रोजीच्या टिप्पणीन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०२६०५२०१६३१२२९१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F7CCDB18D954BB814D3CC3C92AB0C128E19F5F95C724ABAF0A38FA1A74DEC734, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A45294B68B97E03C570AFA8F17C64F6DFE2A4A241DD2AFF2322FEEC22B389F5, cn=YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2026.05.20 16:32:55 +05'30'

**( युवराज सोरेगांवकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. प्रधान सचिव (मावज), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परिक्षा), मुंबई,
५. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई, (मावज मार्फत),
७. सर्व उपसंचालक (माहिती) (मावज मार्फत),
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे. (मावज मार्फत),
१०. संबंधित अधिकारी (मावज मार्फत),
११. निवडनस्ती .